**ठळक बातम्या**

- सोने आणि इतर मौल्यवान धातूंवरच्या आयात शुल्कात आजपासून वाढ
- पुद्दुचेरीत काँग्रेस नेते एन. रंगासामी यांनी घेतली, मुख्यमंत्री पदाची शपथ
- तामिळनाडू विधानसभेत, ‘मुख्यमंत्री जोसेफ विजय’ यांनी विश्वासदर्शक ठराव जिंकला

**आणि**

- भारतात या आठवड्यात नैर्ऋत्य मोसमी पावसाचं आगमन होण्याचा भारतीय हवामानशास्त्र विभागाचा अंदाज

**<><><><><>**

केंद्र सरकारने सोने आणि इतर मौल्यवान धातूंवरच्या आयात शुल्कात वाढ केली असून, ही वाढ आजपासून लागू झाली. अर्थ मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात ही माहिती देण्यात आली. सोने आणि चांदी या धातूंवर ५ टक्के शुल्क आकारलं जाईल, तर प्लॅटिनमच्या काही घटकांसाठी ५ पूर्णांक ४ दशांश टक्के शुल्क लागू होईल. परकीय चलन वाचवण्यासाठी इतर उपाययोजनांबरोबरच सामाजिक कल्याण अधिभार तसंच पायाभूत सुविधा आणि कृषी अधिभार वाढवल्याचं अर्थमंत्रालयाने जाहीर केलेल्या या निवेदनात म्हटलं आहे. पश्चिम आशियातल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर काल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना सोनेखरेदी टाळण्याचं आव्हान केलं होतं.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धपरिस्थितीमुळे निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इंधनाचा वापर नियंत्रित करण्याचं आवाहन केलं होतं, त्या आवाहनानुसार प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या देशांतर्गत

दौऱ्यांसाठीच्या ताफ्यात कपात केली आहे. विशेष सुरक्षा दलाच्या कार्यपद्धती नुसार ताफ्यातली अत्यावश्यक सुरक्षा अबाधित ठेवण्यात आली असून सुरक्षा दलातली अवांतर वाहनं कमी करण्यात आली आहेत. प्रधानमंत्र्यांच्या गुजरात आणि आसाम राज्यातल्या आगामी दौऱ्यासाठी देखील वाहनांच्या संख्येत कपात करण्यात आली आहे.

गृहमंत्री अमित शहा यांनी देखील प्रधानमंत्र्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत त्यांचा सुरक्षा यंत्रणेचा ताफा निम्म्याहुन अधिक कमी केला आहे.

**<><><><><>**

इंडोनेशियाचे परराष्ट्र मंत्री सुगिओनो यांचं आज नवी दिल्लीत आगमन झालं आहे. ब्रिक्स देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत ते सहभागी होणार असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची देखील भेट घेणार आहेत. उद्यापासून दोन दिवस नवी दिल्ली इथं ही बैठक होणार आहे. ब्रिक्स सदस्य देशांचे परराष्ट्रमंत्री आणि प्रतिनिधी मंडळाचे सदस्य बैठकीला उपस्थित राहणार  असून जागतिक पातळीवरच्या अनेक गंभीर मुद्द्यांवर ते विचारविनिमय करणार आहेत.

**<><><><><>**

पुद्दुचेरीत काँग्रेस नेते एन. रंगासामी यांनी आज मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. पुद्दुचेरीचे राज्यपाल के. कैलाशनाथन यांनी, पुद्दुचेरीच्या लोकनिवासमध्ये रंगासामी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. काँग्रेसचे मलाडीकृष्ण राव आणि भाजपाचे एन नमस्सि-वायम यांनीही यावेळी मंत्रीपदाची शपथ घेतली. रंगासामी यांची पाचव्यांदा मुख्यमंत्री म्हणून निवड झाली आहे. शपथविधीच्या वेळी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन, राष्ट्रीय  सरचिटणीस बी.एल, संतोष उपस्थित होते.

**<><><><><>**

तामिळनाडू विधानसभेत मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी विश्वासदर्शक ठराव जिंकला आहे. जोसेफ विजय यांच्या टीव्हीके म्हणजेच तमिळगा वेत्री कळघम पक्षाने

मांडलेल्या विश्वासदर्शक ठरावाला त्यांच्या मित्रपक्षाबरोबरच अण्णा द्रमुकच्या एका गटाने आणि अम्मा मक्कल मुन्नेत्र कळघममधून निलंबित केलेले आमदार एस. कामराज यांनी पाठिंबा दिला. ठरावाला १४४ आमदारांनी पाठिंबा दिला, २२ जणांनी विरोधात मत दिलं तर ५ जण तटस्थ राहिले. तामिळनाडू विधानसभेत ११८ जणांचं पाठबळ आवश्यक असताना आता टीव्हीकेकडे १४४ जणांचं बहुमत आहे.

**<><><><><>**

सांगली जिल्ह्यात जत तालुक्यातील मोटेवाडी आसंगी तुर्क इथल्या मरगुबाई यात्रेदरम्यान काल सहा भाविकांचा मृत्यू झाला. अचानक आलेल्या पावसामुळे हे भाविक भिंतीच्या आडोशाला बसले असता भिंत कोसळून हा अपघात झाला. भाविकांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

या यात्रेसाठी ३०० हून अधिक भाविक आले होते. यावेळी अचानक आलेल्या पावसापासून बचाव करण्यासाठी काही भाविक एका भिंतीच्या आडोशाला बसले असताना आलेल्या जोरदार वाऱ्याने भिंतीवरचे पत्रे उडाले आणि भिंत कोसळली. यामध्ये ६ भाविकांचा मृत्यू झाला तर २० भाविक जखमी झाले. मृतांमधले तीन भाविक हे जत तालुक्यातले तर तीनजण कर्नाटकातले होते. जखमींना जत, सांगली आणि कर्नाटकातल्या विजापूर इथं दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या कथित प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सीबीआयचं पथक जयपूरमध्ये दाखल झालं आहे. राजस्थान पोलिसांच्या विशेष कृती दलानं ताब्यात घेतलेल्या सुमारे दोन डझन संशयितांची सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली आहे.

दरम्यान, राजस्थान पोलिसांनी या प्रकरणा संदर्भात परिसरातल्या शंभरपेक्षा अधिक लोकांची चौकशी केली आहे.

<><><><><>

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागान अंमली पदार्थासंबंधित विविध गुन्ह्यांमधला फरार आरोपी प्रभदीप सिंग याचं अझरबैजान इथून यशस्वी प्रत्यार्पण केलं आहे. सीबीआयनं परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि दिल्ली पोलिसांच्या सहकार्यानं त्याचं प्रत्यार्पण केलं आहे. त्याच्यावर दिल्लीच्या विशेष पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याखाली तो हवा होता अशी माहिती सीबीआयनं दिली आहे. प्रभदीप हा अंमली पदार्थांच्या टोळीचा म्होरक्या होता आणि त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ जप्त करून त्याच्या साथीदारांनाही अटक करण्यात आली होती. गेल्या काही वर्षात परदेशात फरार झालेल्या एकूण १६० हून अधिक आरोपींना भारतात आणण्यात आले असल्याची माहितीही सीबीआयनं दिली आहे.

<><><><><>

समाजवादी पक्षाचे नेते मुलायमसिंग यादव यांचा धाकटा मुलगा प्रतिक यादव यांचं आज आकस्मक निधन झालं. त्यांना उपचारासाठी लखनौच्या शहर रुग्णालयात आणलं असता त्यांचं निधन झाल्याचं घोषित करण्यात आलं. शवविच्छेदनानंतर त्यांच्या मृत्यूचं कारण समजेल असं रुग्णालयाने म्हटलं आहे. ते ३८ वर्षाचे होते. प्रतिक यादव यांची पत्नी अपर्णा बिश्त यादव या भाजपा सदस्य असून राज्य महिला आयोगाच्या उपाध्यक्ष आहेत. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रतिक यादव यांच्या आकस्मिक निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

भारतात या आठवड्यात नैर्ऋत्य मोसमी पावसाचं आगमन होईल, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. या आठवड्याच्या अखेरीला बंगालचा उपसागर, अंदमान बेटांनजीकचा समुद्र तसंच अंदमान-निकोबार बेटांच्या काही भागांवर नैर्ऋत्य मोसमी पावसाच्या आगमनासाठी परिस्थिती अनुकूल होत आहे. बंगालच्या उपसागराच्या नैर्ऋत्य भागात कमी दाबाचं क्षेत्र निर्माण झालं आहे. त्यामुळे

तिथे चक्रीवादळ सदृश स्थिती निर्माण झाली असून पुढच्या २४ तासांत ती अधिक तीव्र होईल, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेच्या पश्चिम तसंच दक्षिण भागात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात श्रीलंकेजवळ तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे हवेतल्या बदल होऊन २०० मिलीमीटरहून जास्त पावसाची शक्यता श्रीलंकेच्या हवामान विभागानं वर्तवली आहे.  येते काही दिवस हवेतले बदल कायम राहतील त्यामुळे पूर, जोरदार वारे तसंच विजांचा कडकडाट यांची शक्यता असल्यानं नागरिकांनी काळजी घ्यावी असं श्रीलंकेच्या हवामान विभागानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात होणार आहे. न्यू रायपूर इथे ‘शहीद वीर नारायण सिंग मैदानावर’ संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

अहमदाबाद इथे झालेल्या कालच्या सामन्यात गुजरात टायटन्सने सनरायझर्स हैदराबादचा ८२ धावांनी पराभव केला. या विजयामुळे गुजरातचा संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानावर आला आहे.

**//<><><><><>//**